**राज्य मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१०९०/१३/अपील क्र.HQ/६५०/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१०८९/१३/अपील क्र.HQ/६५१/२०१३/०२**

**श्री. श्रीकांत वसंत जोगळेकर,**
आदित्य बिल्डींग, १ ला माळा, एन.एस. फडके मार्ग,
तेली गल्ली जंक्शन, फ्लाय ओव्हर अपार्टमेंटच्या समोर,
अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००६९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
(परि - ९), सेंट मार्टिन रस्ता, वांद्रे (पश्चिम),
हिल रोड, मुंबई ४०० ०५०.

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त,**
पश्चिम नियंत्रण कक्ष, क्वॉर्टर रोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०.

**द्वितीय** अपिलाचा दिनांक : २९.०४.२०१३
सुनावणीचा दिनांक : २०.०५.२०१३
अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय प्राधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२.१०.२०१२ व २१.११.२०१२ | २४.१२.२०१२ | ३०.११.२०१२ | - |

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-६(१) अन्वये त्यांचे दोन अर्ज दि. २२.१०.२०१२ व २१.११.२०१२ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. बाबूराव रानोजी गायकवाड यांनी अपीलकर्ता यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीसंबंधीचे प्रथम खबरी अहवाल, तक्रारींच्या प्रती घेतलेले जाबजबाब इत्यादीची माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. ३०.११.२०१२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी काहीही निर्णय दिलेला नाही.

अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देखील दिलेले नसल्याने अपीलकर्ता यांनी आयोगाकडे प्रस्तुत व्दितीय अपील दि. २९.०४.२०१३ रोजी दाखल केले. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांना व्दितीय अपिलाच्या अनुषंगाने नोटीस काढून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले.

आजच्या सुनावणीस अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. २२.१०.२०१२ व २१.११.२०१२ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप अपीलकर्ता यांना मिळालेली नसल्याचे सांगितले विशेषत: त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,

अपीलकर्ता यांना दि. २४.१२.२०१२ रोजी उत्तर देण्यात आले असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती दिल्यास तपास कार्यात अडथळा निर्माण होणार असून माहिती पुरविता येणार नाही असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे.

या प्रकरणात अपिलकर्ता यांनी मा.उच्च न्यायालय, दिल्ली यांचे दि. ६डिसेंबर २०१० चे W.P.(Crl.)No.468/2010 या प्रकरणात दिल्ली पोलिस यांनी दि.१ फेब्रुवारी २०११ पासून सर्व प्रथम खबरी अहवाल पोलिसांच्या संकेतस्थळावर ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत तसेच जे प्रथम खबरी अहवाल संकेतस्थळावर ठेवणे योग्य होणार नाही त्याबाबतचा निर्णय स्पष्ट आदेश देऊन पोलिस उपायुक्त व त्यावरील अधिका-यांनी घ्यावा असेही आदेश मा.उच्च न्यायालय,दिल्ली यांनी दिल्याचे अपिलकर्ता यांनी निर्दशनास आणून दिले असे सांगून सदर आदेशाची प्रत सुनावणी दरम्यान सादर केली. तसेच प्रथम खबरी अहवाल उघड केल्याचे तपास कार्यात कोणताही अडथळा निर्माण होत नाही असेही सांगितले. तसेच जे प्रथम खबरी अहवाल संकेतस्थळावर ठेवणे योग्य होणार नाही त्याबाबतचा निर्णय स्पष्ट आदेश देऊन पोलिस उपायुक्त व त्यावरील अधिका-यांनी घ्यावा असेही आदेश मा.उच्च न्यायालय,दिल्ली यांनी दिल्याचे अपिलकर्ता यांनी निर्दशनास आणून दिले.

अपिलकर्ता यांनी मांडलेला मुददा योग्य असून माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम-४(१)(ख)(ग)(घ)नुसार प्रथम खबरी अहवाल पोलिसांच्या संकेतस्थळावर ठेवणे अगत्याचे आहे. कारण असे केल्याने नागरिकांना राज्यातील गुन्हेगारीचे स्वरुप या विषयी कल्पना येऊ शकेल.

यास्तव माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)अन्वये पोलिस महासंचालक यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, मा.उच्च् न्यायालय,दिल्ली यांचे दि.६ डिसेंबर २०१० चे W.P.(Crl.)No.468/2010 या प्रकरणात दिल्ली पोलिस यांनी दि.१ फेब्रुवारी २०११ पासून सर्व प्रथम खबरी अहवाल पोलिसांच्या संकेतस्थळावर (यात पोलिस आयुक्तालायाचा देखील समावेश आहे.) ठेवण्याचे दिलेले आदेश लक्षात घेता, पोलिस महासंचालकांनी महाराष्ट्रातील सर्व पोलिस स्टेशनसमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल केल्याबाबतची माहिती(ज्या प्रकरणात प्रथम खबरी अहवाल संकेतस्थळावर ठेवणे योग्य होणार नाही अशा बाबत पोलिस आयुक्त किंवा त्यावरील दर्जाच्या अधिका-यांचा लेखी अभिप्राय घेऊन असे प्रकरणे वगळून ) उर्वरित प्रकरणे प्रकरण निहाय संकेतस्थळावर टाकावी व आयोगास दि.३० जुन २०१३ पर्यंत अनुपालन अहवाल पाठवावा.

तसेच यास्तव या प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-८ (ज) लागू होतो हे जन माहिती अधिकारी यांचे विधान विपर्यस्त असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-१० प्रमाणे या संबंधित मुद्यांबाबतच्या माहितीचे पृथक्करण(severability) च्या आधारे ज्या मुद्यांची माहिती दिल्याने तपास कार्यात अडथळा निर्माण होणार नाही अशा मुद्यांची माहिती अपीलकर्ता यांना दि. १० जुन २०१३ पुरविण्यात यावी.

**आदेश**

**वरील दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २०.०५.२०१३**

**( रत्नाकर गायकवाड )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

1. प्रत, पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
2. प्रत, सर्व पोलिस आयुक्त, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

त्यांनी आयोगास दिनांक 30 जुन 2013 पर्यत अनुपालन अहवाल पाठवावा.